.. Dasabodh by Samartha Ramadas Swami Chapter 6 ..

॥ समर्थ रामदासांचा दासबोध दशक ६ ॥

॥ दशक सहावा : देवशोधन ॥ ६॥

समास पहिला : देवशोधन

॥ श्रीराम ॥

चित्त सुचित करावें । बोलिलें तें जीवीं धरावें ।
सावध होऊन बैसावें । निमिष येक ॥ १॥
कोणी येके ग्रामीं अथवा देशीं । राहणें आहे आपणासी ।
न भेटतां तेथिल्या प्रभूसी । सौख्य कैंचें ॥ २॥
म्हणौनि ज्यास जेथें राहणें । तेणें त्या प्रभूची भेटी घेणें ।
म्हणिजे होय श्लाघ्यवाणें । सर्व कांहीं ॥ ३॥
प्रभूची भेटी न घेतां । तेथें कैंची मान्यता ।
आपुलें महत्व जातां । वेळ नाहीं ॥ ४॥
म्हणौनि रायापासूनि रंक ।कोणी येक तरी नायक ।var तरी येक
त्यास भेटणें हा विवेक । विवेकी जाणती ॥ ५॥
त्यास न भेटतां त्याचे नगरीं । राहतां धरितील बेगारी ।
तेथें न करितां चोरी । अंगीं लागे ॥ ६॥
याकारणें जो शहाणा । तेणें प्रभूसी भेटावें जाणा ।
ऐसें न करितां दैन्यवाणा । संसार त्याचा ॥ ७॥
ग्रामीं थोर ग्रामाधिपती । त्याहूनि थोर देशाधिपती ।
देशाधिपतीहूनि नृपती । थोर जाणावा ॥ ८॥
राष्ट्राचा प्रभु तो राजा । बहुराष्ट्र तो महाराजा ।
महाराजांचाही राजा । तो चक्रवर्ती ॥ ९॥
येक नरपती येक गजपती । येक हयपती येक भूपती ।
सकळांमध्ये चक्रवर्ती । थोर राजा ॥ १०॥
असो ऐशिया समस्तां । येक ब्रह्मा निर्माणकर्ता ।
त्या ब्रह्मयासही निर्मिता । कोण आहे ॥ ११॥
ब्रह्मा विष्णु आणि हर । त्यांसी निर्मिता तोचि थोर ।
तो वोळखावा परमेश्वर । नाना यत्नें ॥ १२॥
तो देव ठायीं पडेना । तरी यमयातना चुकेना ।
ब्रह्माण्डनायका चोजवेना । हें बरें नव्हे ॥ १३॥
जेणें संसारीं घातलें । अवघें ब्रह्माण्ड निर्माण केलें ।
त्यासी नाहीं वोळखिलें । तोचि पतित ॥ १४॥
म्हणोनि देव वोळखावा । जन्म सार्थकचि करावा ।
न कळे तरी सत्संग धरावा । म्हणजे कळे ॥ १५॥
जो जाणेल भगवंत । तया नांव बोलिजे संत ।
जो शाश्वत आणि अशाश्वत । निवाडा करी ॥ १६॥
चळेना ढळेना देव । ऐसा ज्याचा अंतर्भाव ।
तोचि जाणिजे महानुभाव । संत साधू ॥ १७॥
जो जनांमध्ये वागे । परी जनांवेगळी गोष्टी सांगे ।
ज्याचे अंतरीं ज्ञान जागे । तोचि साधू ॥ १८॥
जाणिजे परमात्मा निर्गुण । त्यासींच म्हणावें ज्ञान ।
त्यावेगळें तें अज्ञान । सर्व कांहीं ॥ १९॥
पोट भराव्याकारणें । नाना विद्या अभ्यास करणें ।
त्यास ज्ञान म्हणती परी तेणें । सार्थक नव्हे ॥ २०॥
देव वोळखावा येक । तेंचि ज्ञान तें सार्थक ।
येर अवघेंचि निरर्थक । पोटविद्या ॥ २१॥
जन्मवरी पोट भरिलें । देहाचें संरक्षण केलें ।
पुढें अवघेंचि व्यर्थ गेलें । अंतकाळीं ॥ २२॥
एवं पोट भरावयाची विद्या । तियेसी म्हणों नये सद्विद्या ।
सर्वव्यापक वस्तु सद्या । पाविजे तें ज्ञान ॥ २३॥
ऐसें जयापाशीं ज्ञान । तोचि जाणावा सज्जन ।
तयापासीं समाधान । पुशिलें पाहिजे ॥ २४॥
अज्ञानास भेटतां अज्ञान । तेथें कैंचें सांपडेल ज्ञान ।
करंट्यास करंट्याचें दर्शन । होतां भाग्य कैंचें ॥ २५॥
रोग्यापाशीं रोगी गेला । तेथें कैंचें आरोग्य त्याला ।
निर्बळापाशीं निर्बळाला । पाठी कैंची ॥ २६॥
पिशाच्यापाशीं पिशाच गेलें । तेथें कोण सार्थक जालें ।
उन्मत्तास उन्मत्त भेटलें । त्यास उमजवी कवणू ॥ २७॥
भिकाऱ्यापाशीं मागतां भिक्षा । दीक्षाहीनापाशीं दीक्षा ।
उजेड पाहातां कृष्णपक्षा । पाविजे कैंचा ॥ २८॥
अबद्धापाशीं गेला अबद्ध । तो कैसेनि होईल सुबद्ध ।
बद्धास भेटतां बद्ध । सिद्ध नव्हे ॥ २९॥
देह्यापाशीं गेला देही । तो कैसेनि होईल विदेही ।
म्हणोनि ज्ञात्यावांचूनि नाहीं । ज्ञानमार्ग ॥ ३०॥
याकारणें ज्ञाता पहावा । त्याचा अनुग्रह घ्यावा ।
सारासारविचारें जीवा । मोक्ष प्राप्त ॥ ३१॥
इति श्रीदासबोधे गुरुशिष्यसंवादे
देवशोधननिरूपणनाम समास पहिला ॥ १॥ ६.१
जय जय रघुवीर समर्थ ॥

समास दुसरा : ब्रह्मपावननिरूपण

॥ श्रीराम ॥

ऐका उपदेशाचीं लक्षणें । सायुज्यप्राप्ति होय जेणें ।
नाना मतांचें पेखणें । कामा नये सर्वथा ॥ १॥
ब्रह्मज्ञानावीण उपदेश । तो म्हणों नये विशेष ।
धान्येविण जैसें भूस । खातां नये ॥ २॥
नाना काबाड बडविलें । नातरी तक्रचि घुसळिलें ।

अथवा धुवणचि सेविलें । सावकाश ॥ ३॥
नाना साली भक्षिल्या । अथवा चोइट्या चोखिल्या ।
खोबरें सांडून खादल्या । नरोट्या जैशा ॥ ४॥
तैसें ब्रह्मज्ञानाविण । नाना उपदेशांचा शीण ।
सार सांडून असार कोण । शहाणा सेवी ॥ ५॥
आतां ब्रह्म जें कां निर्गुण । तेंचि केलें निरूपण ।
सुचित करावें अंतःकरण । श्रोतेजनीं ॥ ६॥
सकळ सृष्टीची रचना । तें हें पंचभूतिक जाणा ।
परंतु हें तगेना । सर्वकाळ ॥ ७॥
आदि अंतीं ब्रह्म निर्गुण । तेचि शाश्वताची खूण ।
येर पंचभूतिक जाण । नासिवंत ॥ ८॥
येरवीं हीं पाहातां भूतें । देव कैसें म्हणावें त्यांतें ।
भूत म्हणतां मनुष्यांतें । विषाद वाटे ॥ ९॥
मा तो जगज्जनक परमात्मा । त्यासि आणि भूतउपमा ।
ज्याची कळेना महिमा । ब्रह्मादिकांसी ॥ १०॥
भूतां ऐसा जगदीश । म्हणतां उत्पन्न होतो दोष ।
याकारणें महापुरुष । सर्व जाणती ॥ ११॥
पृथ्वी आप तेज वायु आकाश । यां सबाह्य जगदीश ।
पंचभूतांस आहे नाश । आत्मा अविनाशरूपी ॥ १२॥
जें जें रूप आणि नाम । तो तो अवघाच भ्रम ।
नामरूपातीत वर्म । अनुभवें जाणावें ॥ १३॥
पंचभूतें आणि त्रिगुण । ऐसी अष्टधा प्रकृति जाण ।
अष्टधा प्रकृतीस नामाभिधान । दृश्य ऐसें ॥ १४॥
तें हें दृश्य नाशिवंत । ऐसें वेद श्रुति बोलत ।
निर्गुण ब्रह्म शाश्वत । जाणती ज्ञानी ॥ १५॥
जें शस्त्रें तोडितां तुटेना । जें पावकें जाळितां जळेना ।
जें कालवितां कालवेना । आपेंकरूनी ॥ १६॥
जें वायूचेनि उडेना । जें पडेना ना झडेना ।
जें घडेना ना दडेना । परब्रह्म तें ॥ १७॥
ज्यासि वर्णचि नसे । जें सर्वांहूनि अनारिसें ।
परंतु असतचि असे । सर्वकाळ ॥ १८॥
दिसेना तरी काय जालें । परंतु तें सर्वत्र संचलें ।
सूक्ष्मचि कोंदाटलें । जेथें तेथें ॥ १९॥
दृष्टीस लागली सवे । जें दिसेल तेंचि पहावें ।
परंतु गुज तें जाणावें । गौप्य आहे ॥ २०॥
प्रगट तें जाणावें असार । आणि गुप्त तें जाणावें सार ।
सद्गुरुमुखें हा विचार । उमजों लागे ॥ २१॥
उमजेना तें उमजावें । दिसेना तें पहावें ।
जें कळेना तें जाणावें । विवेकबळें ॥ २२॥
गुप्त तेंचि प्रगटवावें । असाध्य तेंचि साधावें ।
कानडेंचि अभ्यासावें । सावकाश ॥ २३॥
वेद विरंचि आणि शेष । जेथें शिणले निःशेष ।
तेंचि साधावें विशेष । परब्रह्म तें ॥ २४॥
तरी तें कोणेपरी साधावें । तेंचि बोलिलें स्वभावें ।
अध्यात्मश्रवणें पावावें । परब्रह्म तें ॥ २५॥
पृथ्वी नव्हे आप नव्हे । तेज नव्हे वायु नव्हे ।
वर्णवेक्त ऐसें नव्हे । अव्यक्त तें ॥ २६॥
तयास म्हणावें देव । वरकड लोकांचा स्वभाव ।
जितुके गांव तितुके देव । जनांकारणें ॥ २७॥
ऐसा देवाचा निश्चयो जाला । देव निर्गुण प्रत्यया आला ।
आतां आपणचि आपला । शोध घ्यावा ॥ २८॥
माझें शरीर ऐसें म्हणतो । तरी तो जाण देहावेगळाचि तो ।
मन माझें ऐसें जाणतो । तरी तो मनही नव्हे ॥ २९॥
पाहातां देहाचा विचार । अवघा तत्वांचा विस्तार ।
तत्वें तत्व झाडितां सार । आत्माचि उरे ॥ ३०॥
आपणासि ठावचि नाहीं । येथें पाहाणें नलगे कांहीं ।
तत्वें ठाईंचा ठाई । विभागून गेलीं ॥ ३१॥
बांधली आहे तों गांठोडी । जो कोणी विचारें सोडी ।
विचार पाहातां गांठोडी । आढळेना ॥ ३२॥
तत्वांचें गांठोडें शरीर । याचा पाहातां विचार ।
येक आत्मा निरंतर । आपण नाहीं ॥ ३३॥
आपणासि ठावचि नाहीं । जन्म मृत्यु कैंचे काई ।
पाहातां वस्तूच्या ठायीं । पाप पुण्य नसे ॥ ३४॥
पाप पुण्य यमयातना । हें निर्गुणीं तों असेना ।
आपण तोचि तरी जन्ममरणा । ठावो कैंचा ॥ ३५॥
देहबुद्धीनें बांधला । तो विवेकें मोकळा केला ।
देहातीत होतां पावला । मोक्षपद ॥ ३६॥
झालें जन्माचें सार्थक । निर्गुण आत्मा आपण येक ।
परंतु हा विवेक । पाहिलाचि पहावा ॥ ३७॥
जागें होतां स्वप्न सरे । विवेक पाहातां दृश्य ओसरे ।
स्वरूपानुसंधानें तरे । प्राणिमात्र ॥ ३८॥
आपणास निवेदावें । आपण विवेकें नुरावें ।
आत्मनिवेदन जाणावें । याचें नांव ॥ ३९॥
आधीं अध्यात्मश्रवण । मग सद्गुरुपादसेवन ।
पुढें आत्मनिवेदन । सद्गुरुप्रसादें ॥ ४०॥
आत्मनिवेदनाउपरी । निखळ वस्तु निरंतरी ।
आपण आत्मा हा अंतरीं । बोध जाहला ॥ ४१॥
त्या ब्रह्मबोधें ब्रह्मचि जाला । संसारखेद तो उडाला ।
देह प्रारब्धीं टाकिला । सावकाश ॥ ४२॥
यासि म्हणिजे आत्मज्ञान । येणें पाविजे समाधान ।
परब्रह्मीं अभिन्न । भक्तचि जाहला ॥ ४३॥
आतां होणार तें होईना कां । आणि जाणार तें जाईना कां ।
तुटली मनांतील आशंका । जन्ममृत्यूची ॥ ४४॥
संसारीं पुंडावें चुकलें । देवां भक्तां ऐक्य जालें ।
मुख्य देवासि वोळखिलें । सत्संगेंकरूनी ॥ ४५॥
इति श्रीदासबोधे गुरुशिष्यसंवादे

ब्रह्मप्रतिपादननिरूपणनाम समास दुसरा ॥ २ ॥ ६.२

समास तिसरा : मायोद्भव
॥ श्रीराम ॥
निर्गुण आत्मा तो निर्मळ । जैसें आकाश अंतराळ ।
घन दाट निर्मळ निश्चळ । सदोदित ॥ १ ॥
जें खंडलेंचि नाहीं अखंड । जें उदंडाहूनि उदंड ।
जें गगनाहूनि वाड । अति सूक्ष्म ॥ २ ॥
जें दिसेना ना भासेना । जें उपजेना ना नासेना ।
जें येईना ना जाईना । परब्रह्म तें ॥ ३ ॥
जें चळेना ना ढळेना । जें तुटेना ना फुटेना ।
जें रचेना ना खचेना । परब्रह्म तें ॥ ४ ॥
जें सन्मुखचि सर्वकाळ । जें निष्कलंक आणि निखळ ।
सर्वांतर आकाश पाताळ । व्यापूनि असे ॥ ५ ॥
अविनाश तें ब्रह्म निर्गुण । नासे तें माया सगुण ।
सगुण आणि निर्गुण । कालवलें ॥ ६ ॥
या कर्दमाचा विचार । करूं जाणती योगेश्वर ।
जैसें क्षीर आणि नीर । राजहंस निवडिती ॥ ७ ॥
जड सबळ पंचभूतिक । त्यामध्यें आत्मा व्यापक ।
तो नित्यानित्यविवेक । पाहातां कळे ॥ ८ ॥
उंसामधील घेईजे रस । येर तें सांडिजे बाकस ।
तैसा जगामध्यें जगदीश । विवेकें वोळखावा ॥ ९ ॥
रस नासिवंत पातळ । आत्मा शाश्वत निश्चळ ।
रस अपूर्ण आत्मा केवळ । परिपूर्ण जाणावा ॥ १० ॥
आत्म्यासारिखें येक असावें । मग तें दृष्टांतासि द्यावें ।
दृष्टांतमिसे समजावें । कैसें तरी ॥ ११ ॥
ऐसी आत्मस्थिति संचली । तेथें माया कैसी जाली ।
जैसी आकाशीं वाहिली । झुळूक वायूची ॥ १२ ॥
वायूपासून तेज जालें । तेजापासून आप निपजलें ।
आपापासून आकारलें । भूमंडळ ॥ १३ ॥
भूमंडळापासून उत्पत्ती । जीव नेणों जाले किती ।
परंतु ब्रह्म आदि अंतीं । व्यापून आहे ॥ १४ ॥
जें जें कांहीं निर्माण जालें । तें तें अवघेंचि नासलें ।
परी मुळीं ब्रह्म तें संचलें । जैसें तैसें ॥ १५ ॥
घटापूर्वी आकाश असे । घटामध्येंही आकाश भासे ।
घट फुटतां न नासे । आकाश जैसें ॥ १६ ॥
तैसें परब्रह्म केवळ । अचळ आणि अढळ ।
मध्यें होत जात सकळ । सचराचर ॥ १७ ॥
जें जें कांहीं निर्माण जालें । तें तें आधीं ब्रह्में
व्यापिलें ।
सर्व नासतां उरलें । अविनाश ब्रह्म ॥ १८ ॥
ऐसें ब्रह्म अविनाश । तें सेविती ज्ञाते पुरुष ।
तत्वनिर्शनें आपणास । आपण लाभे ॥ १९ ॥
तत्वें तत्व मेळविलें । त्यासि देह ऐसें नाम ठेविलें ।
तें जाणते पुरुषीं शोधिलें । तत्वें तत्व ॥ २० ॥
तत्वझाडा निःशेष होतां । तेथें निमाली देहअहंता ।
निर्गुण ब्रह्मीं ऐक्यता । विवेकें जाहली ॥ २१ ॥
विवेकें देहाकडे पाहिलें । तों तत्वें तत्व ओसरलें ।
आपण कांहीं नाहीं आलें । प्रत्ययासी ॥ २२ ॥
आपला आपण शोध घेतां । आपुली तों माईक वार्ता ।
तत्वांतीं उरलें तत्वता । निर्गुण ब्रह्म ॥ २३ ॥
आपणाविण निर्गुण ब्रह्म । हेंचि निवेदनाचें वर्म ।
तत्वासरिसा गेला भ्रम । मीतूंपणाचा ॥ २४ ॥
मीपण पाहातां आढळेना । निर्गुण ब्रह्म तें चळेना ।
आपण तेंचि परी कळेना । सद्गुरूविण ॥ २५ ॥
सारासार अवघें शोधिलें । तों असार तें निघून गेलें ।
पुढें सार तें उरलें । निर्गुण ब्रह्म ॥ २६ ॥
आधीं ब्रह्म निरूपिलें । तेंचि सकळामध्यें व्यापिलें ।
सकळ अवघेंचि नासलें । उरलें तें केवळ ब्रह्म ॥ २७ ॥
होतां विवेकें संहार । तेथें निवडे सारासार ।
आपला आपणासि विचार । ठायीं पडे ॥ २८ ॥
आपण कल्पिलें मीपण । मीपण शोधितां नुरे जाण ।
मीपण गेलिया निर्गुण । आत्माचि स्वयें ॥ २९ ॥
झालिया तत्वांचें निरसन । निर्गुण आत्मा तोचि आपण ।
कां दाखवावें मीपण । तत्वनिरसनाउपरी ॥ ३० ॥
तत्वांमध्यें मीपण गेलें । तरी निर्गुण सहजचि उरलें ।
सोहंभावें प्रत्यया आलें । आत्मनिवेदन ॥ ३१ ॥
आत्मनिवेदन होतां । देवभक्तांस ऐक्यता ।
साचार भक्त विभक्तता । सांडूनि जाहला ॥ ३२ ॥
निर्गुणासि नाहीं जन्ममरण । निर्गुणासि नाहीं पाप पुण्य ।
निर्गुणीं अनन्य होतां आपण । मुक्त जाहला ॥ ३३ ॥
तत्वीं वेंटाळूनि घेतला । प्राणी संशयें गुंडाळला ।
आपणास आपण भुलला । कोहं म्हणे ॥ ३४ ॥
तत्वीं गुंतला म्हणे कोहं । विवेकें पाहातां म्हणे सोहं ।
अनन्य होतां अहं सोहं । मावळलीं ॥ ३५ ॥
याउपरि उर्वरित । तेंचि स्वरूप संत ।
देहीं असोनि देहातीत । जाणिजे ऐसा ॥ ३६ ॥
संदेहवृत्ति ते न भंगे । म्हणोनि बोलिलेंच बोलावें लागे ॥
आम्हांसि हें घडलें प्रसंगें । श्रोतीं क्षमा करावें ॥ ३७ ॥
इति श्रीदासबोधे गुरुशिष्यसंवादे
मायोद्भवनाम समास तिसरा ॥ ३ ॥ ६.३

जय जय रघुवीर समर्थ ॥
समास चवथा : ब्रह्मनिरूपण
॥ श्रीराम ॥
कृतायुग सत्रा लक्ष अठ्ठाविस सहस्र । त्रेतायुग बारा
लक्ष शाहाणौ सहस्र ।
द्वापर आठ लक्ष चौसष्टी सहस्र । आतां कलयुग ऐका ॥ १ ॥

कलयुग चार लक्ष बत्तीस सहस्र । चतुर्युगें त्रेचाळीस लक्ष वीस सहस्र ।
ऐसीं चतुर्युगें सहस्र । तो ब्रह्मयाचा येक दिवस ॥ २ ॥
ऐसे ब्रह्मे सहस्र देखा । तेव्हां विष्णूची येक घटिका ।
विष्णू सहस्र होतां ऐका । पळ येक ईश्वराचें ॥ ३ ॥
ईश्वर जाय सहस्र वेळ । तैं शक्तीचें अर्ध पळ ।
ऐसी संख्या बोलिली सकळ । शास्त्रांतरीं ॥ ४ ॥
चतुर्युगसहस्राणि दिनमेकंपितामहम् ।
पितामहसहस्राणि विष्णोर्घटिकमेव च ॥
विष्णोरेकः सहस्राणि पलमेकं महेश्वरम् ।
महेश्वरसहस्राणि शक्तेरर्धं पलं भवेत् ॥
ऐशा अनन्त शक्ती होती । अनंत रचना होती जाती ।
तरी अखंड खंडेना स्थिति । परब्रह्माची ॥ ५ ॥
परब्रह्मासि कैंची स्थिती । परी ही बोलावयाची रीती ।
वेदश्रुती नेति नेति । परब्रह्मीं ॥ ६ ॥
चार सहस्र सातशें साठी । इतुकी कलयुगाची राहाटी ।
उरल्या कलयुगाची गोष्टी । ऐसी असे ॥ ७ ॥
चार लक्ष सत्तावीस सहस्र । दोनशें चाळीस संवत्सर ।
पुढें अन्योन्य वर्णसंकर । होणार आहे ॥ ८ ॥
ऐसें रचलें सचराचर । येथें येकाहूनि येक थोर ।
पाहातां येथींचा विचार । अंत न लगे ॥ ९ ॥
येक म्हणती विष्णु थोर । येक म्हणती रुद्र थोर ।
येक म्हणती शक्ति थोर । सकळांमध्यें ॥ १० ॥
ऐसे आपुलालेपरी बोलती । परंतु अवघेंचि नासेल कल्पांतीं ।
यद्दृष्टं तन्नष्टं हें श्रुति । बोलतसे ॥ ११ ॥
आपुलाली उपासना । अभिमान लागला जनां ।
याचा निश्चयो निवडेना । साधुविण ॥ १२ ॥
साधु निश्चयो करिती येक । आत्मा सर्वत्र व्यापक ।
येर हें अवघेंचि माईक । सचराचर ॥ १३ ॥
चित्रीं लिहिली सेना । त्यांत कोण थोर कोण साना ।
हें तुम्ही विचाराना । आपुलें ठायीं ॥ १४ ॥
स्वप्नीं उदंड देखिलें । लहान थोरही कल्पिलें ।
परंतु जागें जालिया जालें । कैसें पहा ॥ १५ ॥
पाहातां जागृतीचा विचार । कोण लहान कोण थोर ।
झाला अवघाचि विस्तार । स्वप्नरचनेचा ॥ १६ ॥
अवघाचि माईक विचार । कैंचें लहान कैंचें थोर ।
लाहानथोराचा निर्धार । जाणती ज्ञानी ॥ १७ ॥
जो जन्मास येऊन गेला । तो मी थोर म्हणतांच मेला ।
परी याचा विचार पाहिला । पाहिजे श्रेष्ठीं ॥ १८ ॥
जयां जालें आत्मज्ञान । तेचि थोर महाजन ।
वेद शास्त्रें पुराण । साधु संत बोलिले ॥ १९ ॥
एवं सकळांमध्यें थोर । तो येकचि परमेश्वर ।
तयामध्यें हरिहर । होती जाती ॥ २० ॥
तो निर्गुण निराकार । तेथें नाहीं उत्पत्ति विस्तार ।
स्थानमानांचा विचार । ऐलिकडे ॥ २१ ॥
नांव रूप स्थान मान । हा तों अवघाचि अनुमान ।
तथापि होईल निदान । ब्रह्मप्रळयीं ॥ २२ ॥
ब्रह्म प्रळयावेगळें । ब्रह्म नामरूपावेगळें ।
ब्रह्म कोणा येका काळें । जैसें तैसें ॥ २३ ॥
करिती ब्रह्मनिरूपण । जाणती ब्रह्म संपूर्ण ।
तेचि जाणावे ब्राह्मण । ब्रह्मविद ॥ २४ ॥
इति श्रीदासबोधे गुरुशिष्यसंवादे
ब्रह्मनिरूपणनाम सामास चौथा ॥ ४ ॥ ६.४

समास पांचवा : मायाब्रह्मनिरूपण

॥ श्रीराम ॥

श्रोते पुसती ऐसें । मायाब्रह्म तें कैसें ।
श्रोत्या वक्त्याचे मिषें । निरूपण ऐका ॥ १ ॥
ब्रह्म निर्गुण निराकार । माया सगुण साकार ।
ब्रह्मासि नाहीं पारावार । मायेसि आहे ॥ २ ॥
ब्रह्म निर्मळ निश्चळ । माया चंचळ चपळ ।
ब्रह्म निरोपाधि केवळ । माया उपाधिरूप ॥ ३ ॥
माया दिसे ब्रह्म दिसेना । माया भासे ब्रह्म भासेना ।
माया नासे ब्रह्म नासेना । कल्पांतकाळीं ॥ ४ ॥
माया रचे ब्रह्म रचेना । माया खचे ब्रह्म खचेना ।
माया रुचे ब्रह्म रुचेना । अज्ञानासी ॥ ५ ॥
माया उपजे ब्रह्म उपजेना । माया मरे ब्रह्म मरेना ।
माया धरे ब्रह्म धरेना । धारणेसी ॥ ६ ॥
माया फुटे ब्रह्म फुटेना । माया तुटे ब्रह्म तुटेना ।
माया विटे ब्रह्म विटेना । अविनाश तें ॥ ७ ॥
माया विकारी ब्रह्म निर्विकारी । माया सर्व करी ब्रह्म कांहींच न करीं ।
माया नाना रूपें धरी । ब्रह्म तें अरूप ॥ ८ ॥
माया पंचभूतिक अनेक । ब्रह्म तें शाश्वत येक ।
मायाब्रह्माचा विवेक । विवेकी जाणती ॥ ९ ॥
माया लहान ब्रह्म थोर । माया असार ब्रह्म सार ।
माया अर्ति, पार- । ब्रह्मासी नाहीं ॥ १० ॥
सकळ माया विस्तारली । ब्रह्मस्थिति अच्छादिली । var अच्छादली
परी ते निवडून घेतली । साधुजनीं ॥ ११ ॥
गोंडाळ सांडून नीर घेइजे । नीर सांडून क्षीर सेविजे ।
माया सांडून अनुभविजे । परब्रह्म तैसें ॥ १२ ॥
ब्रह्म आकाशा ऐसें निवळ । माया वसुंधरा डहुळ ।
ब्रह्म सूक्ष्म केवळ । माया स्थूळरूप ॥ १३ ॥
ब्रह्म तें अप्रत्यक्ष असे । माया ते प्रत्यक्ष दिसे ।
ब्रह्म तें समचि असे । माया ते विषमरूप ॥ १४ ॥
माया लक्ष्य ब्रह्म अलक्ष्य । माया साक्ष ब्रह्म असाक्ष ।
मायेमध्यें दोन्ही पक्ष । ब्रह्मीं पक्षचि नाहीं ॥ १५ ॥

माया पूर्वपक्ष ब्रह्म सिद्धांत । माया असत् ब्रह्म सत् ।
ब्रह्मासि नाहीं करणें हेत । मायेसि आहे ॥ १६ ॥
ब्रह्म अखंड घनदाट । माया पंचभूतिक पोंचट ।
ब्रह्म तें निरंतर निघोट । माया ते जुनी जर्जरी ॥ १७ ॥
माया घडे ब्रह्म घडेना । माया पडे ब्रह्म पडेना ।
माया विघडे ब्रह्म विघडेना । जैसें तैसें ॥ १८ ॥
ब्रह्म असतचि असे । माया निरसितांच निरसे ।
ब्रह्मास कल्पांत नसे । मायेसि आहे ॥ १९ ॥
माया कठिण ब्रह्म कोमळ । माया अल्प ब्रह्म विशाळ ।
माया नासे सर्वकाळ । ब्रह्मचि असे ॥ २० ॥
वस्तु नव्हे बोलिजे ऐसी । माया जैसी बोलिजे तैसी ।
काळ पावेना वस्तूसी । मायेसी झडपी ॥ २१ ॥
नाना रूप नाना रंग । तितुका मायेचा प्रसंग ।
माया भंगे ब्रह्म अभंग । जैसें तैसें ॥ २२ ॥
आतां असो हा विस्तार । चालत जातें सचराचर ।
तितुकी माया परमेश्वर । सबाह्य अभ्यंतरीं ॥ २३ ॥
सकळ उपाधींवेगळा । तो परमात्मा निराळा ।
जळीं असोन नातळे जळा । आकाश जैसें ॥ २४ ॥
मायाब्रह्मांचें विवरण । करितां चुके जन्ममरण ।
संतांसि गेलिया शरण । मोक्ष लाभे ॥ २५ ॥
अरे या संतांचा महिमा । बोलावया नाहीं सीमा ।
जयांचेनि जगदात्मा । अंतरचि होये ॥ २६ ॥
इति श्रीदासबोधे गुरुशिष्यसंवादे
मायाब्रह्मनिरूपणनाम समास पांचवा ॥ ५ ॥ ६.५
जय जय रघुवीर समर्थ ॥

समास सहावा : सृष्टिकथन
॥ श्रीराम ॥
सृष्टीपूर्वीं ब्रह्म असे । तेथें सृष्टि मुळींच नसे ।
आतां सृष्टि दिसत असे । तें सत्य कीं मिथ्या ॥ १ ॥
तुम्ही सर्वज्ञ गोसांवी । माझी आशंका फेडावी ।
ऐसा श्रोता विनवी । वक्तयासी ॥ २ ॥
आतां ऐका प्रत्योत्तर । कथेसि व्हावें तत्पर ।
वक्ता सर्वज्ञ उदार । बोलता जाला ॥ ३ ॥
जीवभूतः सनातन । ऐसें गीतेचें वचन ।
येणें वाक्यें सत्यपण । सृष्टीस आलें ॥ ४ ॥
यद्दृष्टं तन्नष्टं येणें । वाक्यें सृष्टि मिथ्यापणें ।
सत्य मिथ्या ऐसें कोणें । निवडावें ॥ ५ ॥
सत्य म्हणों तरी नासे । मिथ्या म्हणों तरी दिसे ।
आतां जैसें आहे तैसें । बोलिजेल ॥ ६ ॥
सृष्टीमध्यें बहु जन । अज्ञान आणि सज्ञान ।
म्हणौनियां समाधान । होत नाहीं ॥ ७ ॥
ऐका अज्ञानाचें मत । सृष्टि आहे ते शाश्वत ।
देव धर्म तीर्थ व्रत । सत्यचि आहे ॥ ८ ॥
बोले सर्वज्ञाचा राजा । मूर्खस्य प्रतिमापूजा ।
ब्रह्मप्रळयाच्या पैजा । घालूं पाहे ॥ ९ ॥
तंव बोले तो अज्ञान । तरी कां करिसी संध्यास्नान ।
गुरुभजन तीर्थाटण । कासया फिरावें ॥ १० ॥
श्लोक ॥ तीर्थे तीर्थे निर्मलं ब्रह्मवृन्दम् ।
वृन्दे वृन्दे तत्वचिन्तानुवादः ।
वादे वादे जायते तत्वबोधः ।
बोधे बोधे भासते चन्द्रचूडः ॥ १ ॥
चंद्रचूडाचें वचन । सद्गुरूचें उपासन ।
गुरुगीतानिरूपण । बोलिलें हरें ॥ ११ ॥
गुरूसि कैसें भजावें । आधीं तयासि वोळखावें ।
त्याचें समाधान घ्यावें । विवेकें स्वयें ॥ १२ ॥
श्लोक ॥ ब्रह्मानन्दं परमसुखदं केवलं ज्ञानमूर्तिं
द्वन्द्वातीतं गगनसदृशं तत्वमस्यादिलक्ष्यम् ।
एकं नित्यं विमलमचलं सर्वधीसाक्षिभूतं
भावातीतं त्रिगुणरहितं सद्गुरुं तं नमामि ॥ १ ॥
गुरुगीतेचें वचन । ऐसें सद्गुरूचें ध्यान ।
तेथें सृष्टिमिथ्याभान । उरेल कैंचें ॥ १३ ॥
ऐसें सज्ञान बोलिला । सद्गुरु तो वोळखिला ।
सृष्टि मिथ्या ऐसा केला । निश्चितार्थ ॥ १४ ॥
श्रोता ऐसें न मनी कदा । आधीक उठिला वेवादा ।
म्हणे कैसा रे गोविंदा । अज्ञान म्हणतोसी ॥ १५ ॥
जीवभूतः सनातनः । ऐसें गीतेचें वचन ।
तयासि तूं अज्ञान । म्हणतोसि कैसा ॥ १६ ॥
ऐसा श्रोता आक्षेप करी । विषाद मानिला अंतरीं ।
याचें प्रत्योत्तर चतुरीं । सावध परिसावें ॥ १७ ॥
गीतेंस बोलिला गोविंद । त्याचा न कळे तुज भेद ।
म्हणौनियां व्यर्थ खेद । वाहतोसि ॥ १८ ॥
श्लोकपाद ॥ अश्वत्थः सर्ववृक्षाणां
माझी विभूती पिंपळ । म्हणौनि बोलिला गोपाळ ।
वृक्ष तोडितां तत्काळ । तुटत आहे ॥ १९ ॥
श्लोक ॥ नैनं छिंदंति शस्त्राणि नैनं दहति पावकः ।
न चैनं क्लेदयन्त्यापो न शोषयति मारुतः ॥ १ ॥
शस्त्रांचेनि तुटेना । अग्निचेनि जळेना ।
उदकामध्यें कालवेना । स्वरूप माझें ॥ २० ॥
पिंपळ तुटे शस्त्रानें । पिंपळ जळे पावकानें ।
पिंपळ कालवे उदकानें । नाशिवंत ॥ २१ ॥
तुटे जळे बुडे उडे । आतां ऐक्य कैसें घडे ।
म्हणोनि हें उजेडे । सद्गुरुमुखें ॥ २२ ॥
इन्द्रियाणां मनश्चास्मि । कृष्ण म्हणे मन तो मी ।
तरी कां आवरावी ऊर्मी । चंचळ मनाची ॥ २३ ॥
ऐसें कृष्ण कां बोलिला । साधनमार्ग दाखविला ।
खडे मांडूनि सिकविला । वोनामा जेवीं ॥ २४ ॥

ऐसा आहे वाक्यभेद । सर्व जाणे तो गोविंद ।
देहबुद्धीचा वेवाद । कामा नये ॥ २५॥
वेद शास्त्र श्रुति स्मृती । तेथें वाक्यभेद पडती ।
ते सर्वही निवडती । सद्गुरूचेनि वचनें ॥ २६॥
वेदशास्त्रांचें भांडण । शस्त्रें तोडी ऐसा कोण ।
हें निवडेना साधुविण । कदा कल्पांतीं ॥ २७॥
पूर्वपक्ष आणि सिद्धांत । शास्त्रीं बोलिला संकेत ।
याचा होय निश्चितार्थ । साधुमुखें ॥ २८॥
येऱ्हवीं वादाचीं उत्तरें । येकाहूनि येक थोरें ।
बोलूं जातां अपारें । वेदशास्त्रीं ॥ २९॥
म्हणोनि वादवेवाद- । सांडून, कीजे संवाद ।
तेणें होये ब्रह्मानंद । स्वानुभवें ॥ ३०॥
येके कल्पनेचे पोटीं । होती जाती अनंत सृष्टी ।
तया सृष्टीची गोष्टी । साच केवी ॥ ३१॥
कल्पनेचा केला देव । तेथें जाला दृढभाव ।
देवालागीं येतां खेव । भक्त दुःखें दुःखवला ॥ ३२॥
पाषाणाचा देव केला । येके दिवशीं भंगोन गेला ।
तेणें भक्त दुखवला । रडे पडे आक्रंदे ॥ ३३॥
देव हारपला घरीं । येक देव नेला चोरीं ।
येक देव दुराचारीं । फोडिला बळें ॥ ३४॥
येक देव जापाणिला । येक देव उदकीं टाकिला ।
येक देव नेऊनि घातला । पायातळीं ॥ ३५॥
काय सांगों तीर्थमहिमा । मोडूनि गेला दुरात्मा ।
थोर सत्व होतें तें मा । काय जालें कळेना ॥ ३६॥
देव घडिला सोनारीं । देव वोतिला वोतारीं ।
येक देव घडिला पाथरीं । पाषाणाचा ॥ ३७॥
नर्बदागंडिकातीरीं । देव पडिले लक्षवरी ।
त्यांची संख्या कोण करी । असंख्यात गोटे ॥ ३८॥
चक्रतीर्थीं चक्रांकित । देव असती असंख्यात ।
नाहीं मनीं निश्चितार्थ । येक देव ॥ ३९॥
बाण तांदळे तांब्रनाणें । स्फटिक देव्हारीं पूजणें ।
ऐसे देव कोण जाणे । खरे किं खोटे ॥ ४०॥
देव रेसिमाचा केला । तोही तुटोनियां गेला ।
आतां नवा नेम धरिला । मृत्तिकेचा ॥ ४१॥
आमचा देव बहु सत्य । आम्हां आकांतीं पावत ।
पूर्ण करी मनोरथ । सर्वकाळ ॥ ४२॥
आतां याचें सत्व गेलें । प्राप्त होतें तें जालें ।
प्राप्त न वचे पालटिलें । ईश्वराचेनि ॥ ४३॥
धातु पाषाण मृत्तिका । चित्रलेप काष्ठ देखा ।
तेथें देव कैंचा मूर्खा । भ्रांति पडिली ॥ ४४॥
हे आपुली कल्पना । प्राप्तांऐसीं फळें जाणा ।
परी त्या देवाचिया खुणा । वेगळ्याचि ॥ ४५॥
म्हणौनि हें मायाभ्रमणें । सृष्टि मिथ्या कोटिगुणें ।
वेद शास्त्रें पुराणें । ऐसींच बोलती ॥ ४६॥
साधुसंत मानुभाव । त्यांचा ऐसाचि अनुभव ।
पंचभूतातीत देव । सृष्टि मिथ्या ॥ ४७॥
सृष्टीपूर्वीं सृष्टि चालतां । सृष्टि अवघी संव्हारतां ।
शाश्वत देव तत्वतां । आदिअंतीं ॥ ४८॥
ऐसा सर्वांचा निश्चयो । यदर्थीं नाहीं संशयो ।
वीतरेक आणि अन्वयो । कल्पनारूप ॥ ४९॥
येके कल्पनेचे पोटीं । बोलजेती अष्ट सृष्टि ।
तये सृष्टीची गोष्टी । सावध ऐका ॥ ५०॥
येकी कल्पनेची सृष्टी । दुजी शाब्दिक सृष्टी ।
तिजी प्रत्यक्ष सृष्टी । जाणती सर्व ॥ ५१॥
चौथी चित्रलेपसृष्टी । पांचवी स्वप्नसृष्टी ।
साहावी गंधर्वसृष्टी । ज्वरसृष्टी सातवी ॥ ५२॥
आठवी दृष्टिबंधन । ऐशा अष्ट सृष्टि जाण ।
यामधें श्रेष्ठ कोण । सत्य मानावी ॥ ५३॥
म्हणोनि सृष्टी नासिवंत । जाणती संत महंत ।
सगुणीं भजावें निश्चित । निश्चयालागीं ॥ ५४॥
सगुणाचेनि आधारें । निर्गुण पाविजे निर्धारें ।
सारासारविचारें । संतसंगें ॥ ५५॥
आतां असो हें बहुत । संतसंगें कळे नेमस्त ।
येर्हवीं चित्त दुश्चित । संशई पडे ॥ ५६॥
तंव शिष्यें आक्षेपिलें । सृष्टी मिथ्या ऐसें कळलें ।
परी हें अवघें नाथिलें । तरी दिसतें कां ॥ ५७॥
दृश्य प्रत्यक्ष दिसतें । म्हणोनि सत्यचि वाटतें ।
यासि काय करावें तें । सांगा स्वामी ॥ ५८॥
याचें प्रत्योत्तर भलें । पुढिले समासीं बोलिलें ।
श्रोतां श्रवण केलें । पाहिजे पुढें ॥ ५९॥
एवं सृष्टी मिथ्या जाण । जाणोनि रक्षावें सगुण ।
ऐसी हे अनुभवाची खूण । अनुभवी जाणती ॥ ६०॥
इति श्रीदासबोधे गुरुशिष्यसंवादे
सृष्टिकथननाम समास सहावा ॥ ६॥ ६.६

समास सातवा : सगुणभजन

॥ श्रीराम ॥

ज्ञानें दृश्य मिथ्या जालें । तरी कां पाहिजे भजन केलें ।
तेणें काय प्राप्त जालें । हें मज निरूपावें ॥ १॥
ज्ञानाहून श्रेष्ठ असेना । तरी कां पाहिजे उपासना ।
उपासनेनें जनां । काय प्राप्त ॥ २॥
मुख्य सार तें निर्गुण । तेथें दिसेचिना सगुण ।
भजन केलियाचा गुण । मज निरूपावा ॥ ३॥
जें समस्त नासिवंत । त्यासि भजावें किंनिमित्त ।
सत्य सांडून असत्य । कोणें भजावें ॥ ४॥
असत्याचा प्रत्ययो आला । तरी मग नेम कां लागला ।
सत्य सांडून गलबला । कासया करावा ॥ ५॥

निर्गुणानें मोक्ष होतो । प्रत्यक्ष प्रत्यय येतो ।
सगुण काय देऊं पाहातो । सांगा स्वामी ॥ ६ ॥
सगुण नासिवंत ऐसें सांगतां । पुनः भजन करावें म्हणतां ।
तरी कासयासाठीं आतां । भजन करूं ॥ ७ ॥
स्वामीचे भिडेनें बोलवेना । येऱ्हवीं हें कांहींच मानेना ।
साध्यचि जालिया साधना । कां प्रवर्तावें ॥ ८ ॥
ऐसें श्रोतयाचें बोलणें । शब्द बोले निर्बुजलेपणें ।
याचें उत्तर ऐकणें । म्हणे वक्ता ॥ ९ ॥
सद्गुरु वचन प्रतिपालन । हेंचि मुख्य परमार्थाचें लक्षण ।
वचनभंग करितां विलक्षण । सहजचि जाहलें ॥ १० ॥
म्हणोनि आज्ञेसि वंदावें । सगुण भजन मानावें ।
श्रोता म्हणे हें देवें । कां प्रयोजिलें ॥ ११ ॥
काय मानिला उपकार । कोण जाला साक्षात्कार ।
किंवा प्रारब्धाचें अक्षर । पुसिलें देवें ॥ १२ ॥
होणार हें तों पालटेना । भजनें काय करावें जना ।
हें तों पाहातां अनुमाना । कांहींच न ये ॥ १३ ॥
स्वामीची आज्ञा प्रमाण । कोण करील अप्रमाण ।
परंतु याचा काय गुण । मज निरूपावा ॥ १४ ॥
वक्ता म्हणे सावधपणें । सांग ज्ञानाची लक्षणें ।
तुज कांहीं लागे करणें । किंवा नाहीं ॥ १५ ॥
करणें लागे भोजन । करणें लागे उदकप्राशन ।
मळमूत्रत्यागलक्षण । तेंही सुटेना ॥ १६ ॥
जनाचें समाधान राखावें । आपुलें पारिखें वोळखावें ।
आणि भजनचि मोडावें । हें कोण ज्ञान ॥ १७ ॥
ज्ञान विवेकें मिथ्या जालें । परंतु अवघें नाहीं टाकिलें ।
तरी मग भजनेंचि काय केलें । सांग बापा ॥ १८ ॥
साहेबास लोटांगणीं जावें । नीचासारिखें व्हावें ।
आणि देवास न मानावें । हें कोण ज्ञान ॥ १९ ॥
हरि हर ब्रह्मादिक । हे जयाचे आज्ञाधारक ।
तूं येक मानवी रंक । भजसि ना तरी काय गेलें ॥ २० ॥
आमुचे कुळीं रघुनाथ । रघुनाथ आमुचा परमार्थ ।
जो समर्थाचाही समर्थ । देवां सोडविता ॥ २१ ॥
त्याचे आम्ही सेवकजन । सेवा करितां जालें ज्ञान ।
तेथें अभाव धरितां पतन । पाविजेल कीं ॥ २२ ॥
सद्गुरु सांगती सारासार । त्यास कैसें म्हणावें असार ।
तुज काय सांगणें विचार । शाहाणे जाणती ॥ २३ ॥
समर्थाचे मनींचें तुटे । तेंचि जाणावें अदृष्ट खोटें ।
राज्यपदापासून करंटें । चेवलें जैसें ॥ २४ ॥
मी थोर वाटे मनीं । तो नव्हे ब्रह्मज्ञानी ।
विचार पाहातां देहाभिमानी । प्रत्यक्ष दिसे ॥ २५ ॥
वस्तु भजन करीना । न करीं ऐसेंही म्हणेना ।
तरी जाणावी ती कल्पना । दडोन राहिली ॥ २६ ॥
ना तें ज्ञान ना तें भजन । उगाचि आला देहाभिमान ।
तेथें नाहीं कीं अनुमान । प्रत्ययो तुझा ॥ २७ ॥
तरी आतां ऐसें न करावें । रघुनाथभजनीं लागावें ।
तेणेंचि ज्ञान बोलावें । चळेना ऐसें ॥ २८ ॥
करी दुर्जनांचा संहार । भक्तजनांचा आधार ।
ऐसा हा चमत्कार । रोकडा चाले ॥ २९ ॥
मनीं धरावें तें होतें । विघ्न अवघेंचि नासोनि जातें ।
कृपा केलिया रघुनाथें । प्रचीति येते ॥ ३० ॥
रघुनाथभजनें ज्ञान जालें । रघुनाथभजनें महत्व वाढलें ।
म्हणोनि तुवां केलें । पाहिजे आधीं ॥ ३१ ॥
हें तों आहे सप्रचीत । आणि तुज वाटेना प्रचित ।
साक्षात्कारें नेमस्त । प्रत्ययो करावा ॥ ३२ ॥
रघुनाथ स्मरोन कार्य करावें । तें तत्काळचि सिद्धि पावे ।
कर्ता राम हें असावें । अभ्यंतरीं ॥ ३३ ॥
कर्ता राम मी नव्हे आपण । ऐसें सगुण निवेदन ।
निर्गुणीं तें अनन्य । निर्गुणचि होइजे ॥ ३४ ॥
मी कर्ता ऐसें म्हणतां । कांहींच घडेना सर्वथा ।
प्रतीत पाहासी तरी आतां । शीघ्रचि आहे ॥ ३५ ॥
मी कर्ता ऐसें म्हणसी । तेणें तूं कष्टी होसी ।
राम कर्ता म्हणतां पावसी । यश कीर्ति प्रताप ॥ ३६ ॥
येके भावनेसाठीं । देवासि पडे तुटी ।
कां ते होय कृपादृष्टी । देव कर्ताभावितां ॥ ३७ ॥
आपण आहे दों दिवसांचा । आणि देव बहुतां काळांचा ।
आपण थोडे वोळखीचा । देवास त्रैलोक्य जाणे ॥ ३८ ॥
याकारणें रघुनाथ भजन । त्यासि मानिती बहुत जन ।
ब्रह्मादिक आदिकरून । रामभजनीं तत्पर ॥ ३९ ॥
ज्ञानबळें उपासना । आम्ही भक्त जरी मानूं ना ।
तरी या दोषाचिया पतना । पावों अभक्तपणें ॥ ४० ॥
देव उपेक्षी थोरपणें । तरी मग त्याचें तोचि जाणे ।
अप्रमाण तें श्लाघ्यवाणें । नव्हेचि कीं श्रेष्ठा ॥ ४१ ॥
देहास लागली उपासना । आपण विवेकें उरेना ।
ऐसी स्थिति सज्जना । अंतरींची ॥ ४२ ॥
सकळ मिथ्या होऊन जातें । हें रामभजनें कळों येतें ।
दृश्य ज्ञानियांचें मतें । स्वप्न जैसें ॥ ४३ ॥
मिथ्या स्वप्नविवंचना । तैसी हे सृष्टिरचना ।
दृश्य मिथ्या साधुजनां । कळों आलें ॥ ४४ ॥
आक्षेप जाला श्रोतयांसी । मिथ्या तरी दिसतें कां आम्हासीं ।
याचें उत्तर पुढिलें समासीं । बोलिलें असे ॥ ४५ ॥
इति श्रीदासबोधे गुरुशिष्यसंवादे
सगुणभजननिरूपणनाम समास सातवा ॥ ७ ॥ ६.७

समास आठवा : दृश्यनिरूपण

॥ श्रीराम ॥

मागां श्रोतीं पुसिलें होतें । दृश्य मिथ्या तरी कां दिसतें ।
त्याचें उत्तर बोलिजेल तें । सावध ऐका ॥ १॥
देखिलें तें सत्यचि मानावें । हें ज्ञात्याचें देखणें नव्हे ।
जड मूढ अज्ञान जीवें । हें सत्य मानिजे ॥ २॥
येका देखिल्यासाठीं । लटिक्या कराव्या ग्रंथकोटी ।
संतमहंतांच्या गोष्टी । त्याही मिथ्या मानाव्या ॥ ३॥
माझें दिसतें हेंचि खरें । तेथें चालेना दुसरें ।
ऐशिया संशयाच्या भरें । भरोंचि नये ॥ ४॥
मृगें देखिलें मृगजळ । तेथें धांवे तें बरळ ।
जळ नव्हे मिथ्या सकळ । त्या पशूसि कोणें म्हणावें ॥ ५॥
रात्रौ स्वप्न देखिलें । बहुत द्रव्य सांपडलें ।
बहुत जनांसि वेव्हारिलें । तें खरें कैसेनि मानावें ॥ ६॥
कुशळ चितारी विचित्र । तेणें निर्माण केलें चित्र ।
देखतां उठे प्रीति मात्र । परंतु तेथें मृत्तिका ॥ ७॥
नाना वनिता हस्ती घोडे । रात्रौ देखतां मन बुडे ।
दिवसा पाहातां कातडें । कंटाळवाणें ॥ ८॥
काष्ठी पाषाणी पुतळ्या । नाना ठकारें निर्मिल्या ।
परम सुंदर वाटल्या । परंतु तेथें पाषाण ॥ ९॥
नाना गोपुरीं पुतळ्या असती । वक्रांगें वक्रदृष्टीं पाहाती ।
लाघव देखता भरे वृत्ती । परंतु तेथें त्रिभाग ॥ १०॥
खेळतां नेटके दशावतारी । तेथें येती सुंदर नारी ।
नेत्र मोडिती कळाकुसरीं । परंतु अवघे धटिंगण ॥ ११॥
सृष्टि बहुरंगी असत्य । बहुरूपाचें हें कृत्य ।
तुज वाटे दृश्य सत्य । परी हे जाण अविद्या ॥ १२॥
मिथ्या साचासारिखें देखिलें । परी तें पाहिजे विचारिलें ।
दृष्टि तरळतां भासलें । तें साच कैसें मानावें ॥ १३॥
वरी पाहातां पालथें आकाश । उदकीं पाहातां उताणें
आकाश ।
मध्यें चांदण्याचाही प्रकाश । परी तें अवघें मिथ्या ॥ १४॥
नृपतीनें चितारी आणिले । ज्याचे त्या ऐसे पुतळे केले ।
पाहातां तेचि ऐसे गमले । परी ते अवघे माईक ॥ १५॥
नेत्रीं कांहीं बाहुली नसे । जेव्हां जें पहावें तेव्हां
तें भासे ।
डोळां प्रतिबिंब दिसे । तें साच कैसेनी ॥ १६॥
जितुके बुडबुडे उठती । तितुक्यांमध्यें रूपें दिसती ।
क्षणामध्यें फुटोनि जाती । रूपें मिथ्या ॥ १७॥
लघुदर्पणें दोनी चारी होतीं । तितुकीं मुखें प्रतिबिंबती ।
परी तीं मिथ्या आदिअंतीं । येकचि मुख ॥ १८॥
नदीतीरीं भार जातां । दुसरा भार दिसे पालथा ।
कां पडसादाचा अवचितां । गजर उठे ॥ १९॥
वापी सरोवरांचें नीर । तेथें पशु पक्षी नर वानर ।
नाना पत्रें वृक्ष विस्तार । दिसे दोहीं सवां ॥ २०॥
येक शस्त्र झाडूं जातां । दोन दिसती तत्वतां ।
नाना तंतु टणत्कारितां । द्विधा भासती ॥ २१॥
कां ते दर्पणाचे मंदिरीं । बैसली सभा दिसे दुसरी ।
बहुत दीपांचिये हारीं । बहुत छाया दिसती ॥ २२॥
ऐसें हें बहुविध भासे । साचासारिखें दिसे ।
परी हें सत्य म्हणोन कैसें । विश्वासावें ॥ २३॥
माया मिथ्या बाजीगिरी । दिसे साचाचिये परी ।
परी हे जाणत्यानें खरी । मानूंचि नये ॥ २४॥
लटिकें साचा ऐसे भावावें । तरी मग पारखी कासया असावें ।
एवं ये अविद्येचे गोवें । ऐसेचि असती ॥ २५॥
मनुष्यांची बाजीगिरी । बहुत जनां वाटे खरी ।
शेवट पाहातां निर्धारीं । मिथ्या होये ॥ २६॥
तैसीच माव राक्षसांची । देवांसही वाटे साची ।
पंचवटिकेसि मृगाची । पाठी घेतली रामें ॥ २७॥
पूर्वकाया पालटिती । येकाचेचि बहुत होती ।
रक्तबिंदीं जन्मती । रजनीचर ॥ २८॥
नाना पदार्थ फळेंचि जाले । द्वारकेमध्यें प्रवेशले ।
कृष्णें दैत्य किती वधिले । कपटरूपी ॥ २९॥
कैसें कपट रावणाचें । शिर केलें मावेचें ।
काळनेमीच्या आश्रमाचें । अपूर्व कैसें ॥ ३०॥
नाना दैत्य कपटमती । जे देवांसही नाटोपती ।
मग निर्माण होऊन शक्ती । संहार केला ॥ ३१॥
ऐसी राक्षसांची माव । जाणों न शकती देव ।
कपटविद्येचें लाघव । अघटित ज्यांचें ॥ ३२॥
मनुष्यांची बाजीगिरी । राक्षसांची वोडंबरी ।
भगवंताची नानापरी । विचित्र माया ॥ ३३॥
हे साचासारिखीच दिसे । विचारितांचि नसे ।
मिथ्याचि आभासे । निरंतर पाहातां ॥ ३४॥
साच म्हणावी तरी हे नासे । मिथ्या म्हणावी तरी हे दिसे ।
दोहीं पदार्थीं अविश्वासे । सांगतां मन ॥ ३५॥
परंतु हें नव्हे साचार । मायेचा मिथ्या विचार ।
दिसतें हें स्वप्नाकार । जाण बापा ॥ ३६॥
तथापि असो तुजला । भासचि सत्य वाटला ।
तरी येथें चुका पडिला । ऐक बापा ॥ ३७॥ var तेथें
दृश्यभास अविद्यात्मक । तुझाही देह तदात्मक ।
म्हणोनि हा अविवेक । तेथें संचरला ॥ ३८॥
दृष्टीनें दृश्य देखिलें । मन भासावरी बैसलें ।
परी तें लिंगदेह जालें । अविद्यात्मक ॥ ३९॥
अविद्येनें अविद्या देखिली । म्हणोन गोष्टी विश्वासली ।
तुझी काया अवघी संचली । अविद्येची ॥ ४०॥
तेचि काया मी आपण । हें देहबुद्धीचें लक्षण ।
येणेंकरितां जालें प्रमाण । दृश्य अवघें ॥ ४१॥
इकडे सत्य मानिला देह । तिकडे दृश्य सत्य हा निर्वाह ।
दोहींमध्यें हा संदेह । पैसावला बळें ॥ ४२॥

देहबुद्धी केली बळकट । आणि ब्रह्म पाहों गेला धीट ।
तों दृश्यानें रोधिली वाट । परब्रह्माची ॥ ४३ ॥
तेथें साच मानिलें दृश्याला । निश्चयचि बाणोनि गेला ।
पहा हो केवढा चुका पडिला । अकस्मात ॥ ४४ ॥
आतां असो हें बोलणें । ब्रह्म न पाविजे मीपणें ।
देहबुद्धीची लक्षणें । दृश्य भाविती ॥ ४५ ॥
अस्तिन्चा देहीं मांषाचा डोळा । पाहेन म्हणे ब्रह्माचा गोळा ।
तो ज्ञाता नव्हे आंधळा । केवळ मूर्ख ॥ ४६ ॥
दृष्टीस दिसे मनास भासे । तितुकें काळांतरीं नासे ।
म्हणोनि दृश्यातीत असे । परब्रह्म तें ॥ ४७ ॥
परब्रह्म तें शाश्वत । माया तेचि अशाश्वत ।
ऐसा बोलिला निश्चितार्थ । नानाशास्त्रीं ॥ ४८ ॥
आतां पुढें निरूपण । देहबुद्धीचें लक्षण ।
चुका पडिला तो मी कोण । बोलिलें असे ॥ ४९ ॥
मी कोण हें जाणावें । मीपण त्यागून अनन्य व्हावें ।
मग समाधान तें स्वभावें । अंगीं बाणे ॥ ५० ॥
इति श्रीदासबोधे गुरुशिष्यसंवादे
दृश्यनिरसननाम समास आठवा ॥ ८ ॥ ६.८

श्री रघुवीर समर्थ ॥
समास नववा : सारशोधन
॥ श्रीराम ॥
गुप्त आहे उदंड धन । काय जाणती सेवकजन ।
तयांस आहे तें ज्ञान । बाह्याकाराचें ॥ १ ॥
गुप्त ठेविले उदंड अर्थ । आणि प्रगट दिसती पदार्थ ।
शहाणे शोधिति स्वार्थ । अंतरीं असे ॥ २ ॥
तैसें दृश्य हें माईक । पाहात असती सकळ लोक ।
परी जयांस ठाउका विवेक । ते तदनंतर जाणती ॥ ३ ॥
द्रव्य ठेऊन जळ सोडिलें । लोक म्हणती सरोवर भरलें ।
तयाचें अभ्यंतर कळलें । समर्थ जनांसी ॥ ४ ॥
तैसे ज्ञाते जे समर्थ । तिहीं वोळखिला परमार्थ ।
इतर ते करिती स्वार्थ । दृश्य पदार्थांचा ॥ ५ ॥
काबाडी वाहती काबाड । श्रेष्ठ भोगिती रत्नें जाड ।
हें जयांचें त्यांस गोड । कर्मयोगें ॥ ६ ॥
येक काष्ठस्वार्थ करिती । येक शुभा येकवाटिती ।
तैसे नव्हेत कीं नृपती । सारभोक्ते ॥ ७ ॥
जयांस आहे विचार । ते सुखासनीं जाले स्वार ।
इतर ते जवळील भार । वाहतचि मेले ॥ ८ ॥
येक दिव्यान्नें भक्षिती । येक विष्ठा सावडिती ।
आपण वर्तल्याचा घेती । साभिमान ॥ ९ ॥
सार सेविजे श्रेष्ठीं । असार घेइजे वृथापुष्टीं ।
सारासाराची गोष्टी । सज्ञान जाणती ॥ १० ॥
गुप्त परिस चिंतामणी । प्रगट खडे काचमणी ।
गुप्त हेम रत्नखाणी । प्रगट पाषाण मृत्तिका ॥ ११ ॥
अव्हाशंख अव्हावेल । गुप्त वनस्पती अमूल्य ।
एरंड धोत्रे बहुसाल । प्रगट शिंपी ॥ १२ ॥
कोठें दिसेना कल्पतरू । उदंड शेरांचा विस्तारू ।
पाहातां नाहीं मळियागरू । बोरी बाभळी उदंड ॥ १३ ॥
कामधेनु जाणिजे इंद्रें । सृष्टींत उदंड खिल्लारें ।
महद्भाग्य भोगिजे नृपवरें । इतरां कर्मानुसार ॥ १४ ॥
नाना व्यापार करिती जन । अवघेच म्हणती सकांचन ।
परंतु कुबेराचें महिमान । कोणासीच न ये ॥ १५ ॥
तैसा ज्ञानी योगीश्वर । गुप्तार्थलाभाचा ईश्वर ।
इतर ते पोटाचे किंकर । नाना मतें धुंडिती ॥ १६ ॥
तस्मात् सार तें दिसेना । आणि असार तें दिसे जना ।
सारासारविवंचना । साधु जाणती ॥ १७ ॥
इतरास हें काये सांगणे । खरें खोटें कोण जाणे ।
साधुसंतांचिये खुणे । साधुसंत जाणती ॥ १८ ॥
दिसेना जें गुप्त धन । तयास करणें लागे अंजन ।
गुप्त परमात्मा सज्जन । संगतीं शोधावा ॥ १९ ॥
रायाचें सान्निध्य होतां । सहजचि लाभे श्रीमंतता ।
तैसा हा सत्संग धरितां । सद्वस्तु लाभे ॥ २० ॥
सद्वस्तूस लाभे सद्वस्तु । अव्यवस्थासि अव्यवस्थु ।
पाहातां प्रशस्तासि प्रशस्तु । विचार लाभे ॥ २१ ॥
म्हणोनि हें दृश्यजात । अवघें आहे अशाश्वत ।
परमात्मा अच्युत अनंत । तो या दृष्यावेगळा ॥ २२ ॥
दृश्यावेगळा दृश्याअन्तरीं । सर्वात्मा तो सचराचरीं ।
विचार पाहातां अंतरीं । निश्चयो बाणे ॥ २३ ॥
संसारत्याग न करितां । प्रपंचउपाधि न सांडितां ।
जनांमध्ये सार्थकता । विचारेंचि होये ॥ २४ ॥
हें प्रचीतीचें बोलणें । विवेकें प्रचीत बाणे ।
प्रचीत पाहातील ते शहाणे । अन्यथा नव्हे ॥ २५ ॥
प्रचीत आणि अनुमान । उधार आणि रोकडें धन ।
मानसपूजा प्रत्यक्ष दर्शन । यास महदंतर ॥ २६ ॥
पुढें जन्मांतरीं होणार । हा तो अवघाच उधार ।
तैसें नव्हे सारासार । तत्काळ लभे ॥ २७ ॥
तत्काळचि लाभ होतो । प्राणी संसारीं सुटतो ।
संशय अवघाचि तुटतो । जन्ममरणांचा ॥ २८ ॥
याचि जन्में येणेंचि काळें । संसारीं होइजे निराळें ।
मोक्ष पाविजे निश्चळें । स्वरूपाकारें ॥ २९ ॥
ये गोष्टीस करी अनुमान । तो सिद्धचि पावेल पतन ।
मिथ्या वदेल त्यास आण । उपासनेची ॥ ३० ॥
हें यथार्थचि आहे बोलणें । विवेकें शीघ्रचि मुक्त होणें ।
असोनि कांहींच नसणें । जनांमध्यें ॥ ३१ ॥
देवपद आहे निर्गुण । देवपदीं अनन्यपण ।
हाचि अर्थ पाहातां पूर्ण । समाधान बाणे ॥ ३२ ॥
देहींच विदेह होणें । करून कांहींच न करणें ।

जीवन्मुक्तांचीं लक्षणें । जीवन्मुक्त जाणती ॥ ३३ ॥
येरवीं हें खरें न वाटे । अनुमानेंचि संदेह वाटे ।
संदेहाचें मूळ तुटे । सद्गुरुवचनें ॥ ३४ ॥
इति श्रीदासबोधे गुरुशिष्यसंवादे
सारशोधननिरूपणनाम समास नववा ॥ ९ ॥ ६.९

जय जय रघुवीर समर्थ ॥
समास दहावा : अनुर्वाच्यनिरूपण
॥ श्रीराम ॥
समाधान पुसतां कांहीं । म्हणती बोलिजे ऐसें नाहीं ।
तरी तें कैसें आहे सर्वही । निरोपावें ॥ १ ॥
मुक्यानें गूळ खादला । गोडी न ये सांगाव्याला ।
याचा अभिप्राव मजला । निरूपण कीजे ॥ २ ॥
अनुभवही पुसों जातां । म्हणती न ये किं सांगतां ।
कोणापासीं पुसों आतां । समाधान ॥ ३ ॥
जे ते अगम्य सांगती । न ये माझिया प्रचिती ।
विचार बैसे माझे चित्तीं । ऐसें करावें ॥ ४ ॥
ऐसें श्रोत्याचें उत्तर । याचें कैसें प्रत्योत्तर ।
निरूपिजेल तत्पर । होऊन ऐका ॥ ५ ॥
जें समाधानाचें स्थळ । किं तो अनुभवचि केवळ ।
तेंचि स्वरूप प्रांजळ । बोलोन दाऊं ॥ ६ ॥
जें बोलास आकळेना । बोलिल्याविणहि कळेना ।
जयास कल्पितां कल्पना । हिंपुटी होये ॥ ७ ॥
तें जाणावें परब्रह्म । जें वेदांचें गुह्य परम ।
धरितां संतसमागम । सर्वहि कळे ॥ ८ ॥
तेंचि आतां सांगिजेल । जें समाधान सखोल ।
ऐक अनुभवाचे बोल । अनुर्वाच्य वस्तु ॥ ९ ॥
सांगतां न ये तें सांगणें । गोडी कळाया गूळ देणें ।
ऐसें हें सद्गुरुविणें । होणार नाहीं ॥ १० ॥
सद्गुरुकृपा कळे त्यासी । जो शोधील आपणासी ।
पुढें कळे अनुभवासी । आपेंआप वस्तु ॥ ११ ॥
दृढ करूनियां बुद्धि । आधीं घ्यावी आपशुद्धी ।
तेणें लागे समाधी । अकस्मात ॥ १२ ॥
आपुलें मूळ बरें शोधितां । आपुली तों माईक वार्ता ।
पुढें वस्तुच तत्वतां । समाधान ॥ १३ ॥
आत्मा आहे सर्वसाक्षी । हें बोलिजे पूर्वपक्षीं ।
जो कोणी सिद्धांत लक्षी । तोचि सिद्ध ॥ १४ ॥
सिद्धांतवस्तु लक्षूं जातां । सर्वसाक्षी ते अवस्ता ।
आत्मा तीहून पर्ता । अवस्तातीत ॥ १५ ॥
पदार्थज्ञान जेव्हां सरे । द्रष्टा द्रष्टेपणें नुरे ।
ते समई उतरे । फुंज मीपणाचा ॥ १६ ॥
जेथें मुरालें मीपण । तेचि अनुभवाची खूण ।
अनुर्वाच्य समाधान । या कारणें बोलिजे ॥ १७ ॥
अत्यंत विचाराचे बोल । तरी ते माईक फोल ।
शब्द सबाह्य सखोल । अर्थचि अवघा ॥ १८ ॥
शब्दाकरितां कळे अर्थ । अर्थ पाहातां शब्द व्यर्थ ।
शब्द सांगें तें यथार्थ । परी आपण मिथ्या ॥ १९ ॥
शब्दाकरितां वस्तु भासे । वस्तु पाहातां शब्द नासे ।
शब्द फोल अर्थ असे । घनवटपणें ॥ २० ॥
भूसाकरितां धान्य निपजे । धान्ये घेऊन भूस टाकिजे ।
तैसा शब्द भूंस जाणिजे । अर्थ धान्य ॥ २१ ॥
पोंचटामधें घनवट । घनवटीं उडे पोचट ।
तैसा शब्द हा फलगट । परब्रह्मीं ॥ २२ ॥
शब्द बोलोनि राहे । अर्थ शब्दापूर्वींच आहे ।
याकारणें न साहे । उपमा तया अर्थासी ॥ २३ ॥
भूस सांडून कण घ्यावा । तैसा वाच्यांश त्यजावा ।
कण लक्ष्यांश लक्षावा । शुद्ध स्वानुभवें ॥ २४ ॥
दृश्यावेगळें बोलिजे । त्यास वाच्यांश म्हणिजे ।
त्याचा अर्थ तो जाणिजे । शुद्ध लक्ष्यांश ॥ २५ ॥
ऐसा जो शुद्ध लक्ष्यांश । तोचि जाणावा पूर्वपक्ष ।
स्वानुभव तो अलक्ष्य । लक्षिला नवचे ॥ २६ ॥
जेथें गाळून सांडिलें नभा । जो अनुभवाचा गाभा ।
ऐसा तोही उभा । कल्पित केला ॥ २७ ॥
मिथ्या कल्पनेपासूनि जाला । खरेंपण कैसें असेल त्याला ।
म्हणौनि तेथें अनुभवाला । ठावचि नाहीं ॥ २८ ॥
दुजेविण अनुभव । हें बोलणेंचि तों वाव ।
याकारणें नाहीं ठाव । अनुभवासी ॥ २९ ॥
अनुभवें त्रिपुटी उपजे । अद्वैतीं द्वैतचि लाजे ।
म्हणौनि बोलणें साजे । अनुर्वाच्य ॥ ३० ॥
दिवसरजनीचें परमित्य । करावया मूळ आदित्य ।
तो आदित्य गेलियां उर्वरित- । त्यासि काय म्हणावें ॥ ३१ ॥
शब्द मौन्याचा विचार । व्हावया मूळ वोंकार ।
तो वोंकार गेलिया उच्चार । कैसा करावा ॥ ३२ ॥
अनुभव आणि अनुभविता । सकळ ये मायेचि करितां ।
ते माया मुळीं नसतां । त्यासी काये म्हणावें ॥ ३३ ॥
वस्तु येक आपण येक । ऐसी अस्ती वेगळिक ।
तरि अनुभवाचा विवेक । बोलों येता सुखें ॥ ३४ ॥
वेगळेपणाची माता । ते लटिके वंधेची सुता ।
म्हणोनियां अभिन्नता । मुळींच आहे ॥ ३५ ॥
अजन्मा होता निजेला । तेणें स्वप्नीं स्वप्न देखिला ।
सद्गुरूस शरण गेला । संसारदुःखें ॥ ३६ ॥
सद्गुरुकृपेस्तव । जाला संसार वाव ।
ज्ञान जालिया, ठाव । पुसे अज्ञानाचा ॥ ३७ ॥
आहे तितुकें नाहीं जालें । नाहीं नाहींपणें निमालें ।
आहे नाहीं जाऊन उरलें । नसोन कांहीं ॥ ३८ ॥
सून्यत्वातीत शुद्धज्ञान । तेणें जालें समाधान ।
ऐक्यरूपें अभिन्न । सहजस्थिति ॥ ३९ ॥

अद्वैतनिरूपण होतां । निमाली द्वैताची वार्ता ।
ज्ञानचर्चा बोलों जातां । जागृती आली ॥ ४०॥
श्रोतीं व्हावें सावधान । अर्थीं घालावें मन ।
खुणे पावतां समाधान । अंतरीं कळे ॥ ४१॥
तेणें जितुकें ज्ञान कथिलें । तितुकें स्वप्नावारीं गेलें ।
अनुर्वाच्य सुख उरलें । शब्दातीत ॥ ४२॥
तेथें शब्देंविण ऐक्यता । अनुभव ना अनुभविता ।
ऐसा निवांत तो मागुता । जागृती आला ॥ ४३॥
तेणें स्वप्नीं स्वप्न देखिला । जागा होऊन जागृती आला ।
तेथें शब्द कुंठित जाला । अंत नलगे ॥ ४४॥
या निरूपणाचें मूळ । केलेंचि करूं प्रांजळ ।
तेणें अंतरीं निवळ । समाधान कळे ॥ ४५॥
तंव शिष्यें विनविलें । जी हें आतां निरोपिलें ।
तें पाहिजे बोलिलें । मागुतें स्वामी ॥ ४६॥
मज कळाया कारण । केलेंचि करावें निरूपण ।
तेथील जे कां निजखूण । ते मज अनुभवावी ॥ ४७॥
अजन्मा तो सांग कवण । तेणें देखिला कैसा स्वप्न ।
तेथें कैसें निरूपण । बोलिलें आहे ॥ ४८॥
जाणोनि शिष्याचा आदर । स्वामी देती प्रत्योत्तर ।
तेंचि आतां अति तत्पर । श्रोतीं येथें परिसावें ॥ ४९॥
ऐक शिष्या सावधान । अजन्मा तो तूंचि जण । var तूंच
तुवां देखिला स्वप्नीं स्वप्न । तोही आतां सांगतों ॥ ५०॥
स्वप्नीं स्वप्नाचा विचार । तो तूं जाण हा संसार ।
येथें तुवां सारासार । विचार केला ॥ ५१॥
रिघोनि सद्गुरूस शरण । काढून शुद्ध निरूपण । var रिघोनी
याची करिसी उणखूण । प्रत्यक्ष आतां ॥ ५२॥
याचाचि घेतां अनुभव । बोलणें तितुकें होतें वाव ।
निवांत विश्रांतीचा ठाव । ते तूं जाण जागृती ॥ ५३॥
ज्ञानगोष्टीचा गल्बला- । सरोन, अर्थ प्रगटला ।
याचा विचार घेतां आला । अंतरीं अनुभव ॥ ५४॥
तुज वाटे हे जागृती । मज जाली अनुभवप्राप्ती ।
या नांव केवळ भ्रांती । फिटलीच नाहीं ॥ ५५॥
अनुभव अनुभवीं विराला । अनुभवेंविण अनुभव आला ।
हाही स्वप्नींचा चेईला । नाहींस बापा ॥ ५६॥
जागा जालिया स्वप्नऊर्मी । स्वप्नीं म्हणसी अजन्मा तो मी ।
जागेपणें स्वप्नउर्मी । गेलीच नाहीं ॥ ५७॥
स्वप्नीं वाटे जागेपण । तैसी अनुभवाची खूण ।
आली परी तें सत्य स्वप्न । भ्रमरूप ॥ ५८॥
जागृति या पैलिकडे । तें सांगणें केवि घडे ।
जेथें धारणाचि मोडे । विवेकाची ॥ ५९॥
म्हणोनि तें समाधान । बोलतांचि न ये ऐसें जाण ।
निशब्दाची ऐसी खूण । वोळखावी ॥ ६०॥
ऐसें आहे समाधान । बोलतांच न ये जाण ।
इतुकेन बाणली खूण । निशब्दाची ॥ ६१॥
इति श्रीदासबोधे गुरुशिष्यसंवादे
अनुर्वाच्यनिरूपणनाम समास दहावा ॥ १०॥ ६.१०
जय जय रघुवीर समर्थ ॥
॥ दशक सहावा समाप्त ॥

Encoded by Sunder Hattangadi.
Proofread by Sunder Hattangadi and Vishwas Bhide.
Reproofread by P. D. Kulkarni

Please send corrections to sanskrit@cheerful.com
Last updated August 6, 2014
From http://sanskritdocuments.org .
The text is prepared by volunteers and is
to be used for personal study and research.
The file is not to be copied or reposted for
promotion of any website or individuals or for
commercial purpose without permission.
Help to maintain respect for volunteer spirit